# दिनांक 30/03/2025

1 महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे 26/03/2025 रोजी 00:00 वा ते दि. 27/03/2025 रोजी 00:00 वा च्या दरम्यान मौजे बिरवाडी जुनी बाजारपेठ येथील फिर्यादी यांचे हार्डवेअर दुकानात व राहते घरात, महाड येथे फिर्यादी यांचे मौजे जुनी बाजारपेठ बिरवाडी येथे राहते घराची बिल्डींग असून तळमजल्यावर त्यांचे हार्डवेअर दुकान आहे कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे घरामध्ये कोठूनतरी प्रवेश करून घरामध्ये व दुकानात ठेवलेली एकूण 2,54,000/-रुपये रक्कम ही फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इरादयाने चोरी करून नेले.

याबाबत महाड एम.आय.डी.सी पोलीस ठाणे गुरनं.33/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 331(3),331(4), 305 गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री गायकवाड हे करीत आहेत.

2. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 11:50 वा च्या सुमारास मौजे वावेघर येथील राहते घरी, आरोपीत क्र.01 व 02 यांनी एप्रिल 2024 ते दि.26/03/2025 रोजी रात्रौ 11.30वा पर्यत महिला फिर्यादी यांना वारंवार तुझ्या वडीलां कडून पैसे आण अशी मागणी करत होते. असे बोलून मी दुसरी कडील मुलगी केली असती तर मला भरपुर सर्व काही मिळाले असते. असे बोलून आरोपीत क्रं.1 व 2 हे मानसिक व शारिरीक त्रास देत होते.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.72/2025, बी.एन.एस कलम 85,115(2),352, 351(2),3(5), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास मपोसई/श्री.ढोणे हे करीत आहेत.

3. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/03/2025 रोजी 03:30 वा च्या सुमारास मौजे खालापूर टोलनाक्याचे पाठीमागे 300 मिटर अंतरावर मुंबई-पुणे एक्सप्रेस वे पुणे लेनवर ता.खालापुर येथे फिर्यादी रा.रामहरनई, पो.भोना, ता.सगडी जि.आजमगड, राज्य- उत्त्तरप्रदेश सध्या रा.महिंद्रा कंपनी चाकण 02 नंबर गेटचे बाजुला असलेल्या बॅरेकमध्ये जि.पुणे हे त्याचे ताब्यातील ट्रेलर थांबवून खाली उतरुन हवा चेक करीत असताना 3 ते 4 अनोखळी इसमांनी फिर्यादी यांचे संमत्त्तीशिवाय स्वत:चे फायदेकरीता, लबाडीचे हेतूने ट्रेलरच्या कॅबिनमधुन 24,000/-रुपये किमतीची रोख रक्कम व सोन्याचे ओम लॉकेट चोरुन नेले आहे.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुरनं.111/2025, भा.न्याय.स.2023 चे कलम 305,3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/फरांदे हे करीत आहेत.

4. कजर्त पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 09:00 वा च्या सुमारास - साक्षीदार व आरोपी यांचे मोबाईलवर आरोपीत तसेच साक्षीदार व त्यांचे इतर मित्र असे कर्जत येथील फार्महाउसमध्ये आले होते. त्यावेळी त्यांनी साक्षीदार याचे मोबाईलमध्ये फोटो काढलेले होते. त्यानंतर आरोपी यांने साक्षीदार याचा मोबाईल फार्महाउसमध्ये काढलेले आरोपी व साक्षीदार यांचे फोटो घेण्यासाठी साक्षीदार याचा मोबाईल स्वत:कडे घेवुन साक्षीदार यांच्या मोबाईलमध्ये असलेले पिडीत महिला व साक्षीदार यांचे प्रायव्हेट फोटो व व्हिडीओ आरोपीत याने त्याचे मोबाईलमध्ये पिडीत व साक्षीदार यांचे सहमतीविना व्हाट्सअ‍ॅपद्वारे घेवुन पिडीताचे खाजगीपणाचे उल्लंघन करुन चोरुन अश्लील चित्रण केले.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं.92/2025, माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 (2008 चे सुधारणेसह) 66 (e), 67, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 77 सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम 2000 चे कलम 66 ( ई ), 67 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोनि/सुरेंद्र गरड हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 29.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 296 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 3,15,200/-रुपये इतका दंड आकारला आहे.